# विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१६ मधील नि. ६१ वरील आदेश

**(CNR–MHAH** २३–०००१७१–२०१६)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्याचे कामकाज चालु असतांना दिनांक २५/०७/२०२३ रोजी वादी ताराबाई सीताराम पोटावळे ही दिनांक २५/०७/२०२३ रोजी मौजे राजापुर तालुका श्रीगोंदा येथे आजारपणाने मयत झाली आहे. त्यांचे वारस दाव्यामध्ये समाविष्ट करावयाचे आहेत. त्या अनुषंगाने वादी ताराबाई सीताराम पोटावळे हिस अर्जा मध्ये नमुद केल्या प्रमाणे एकूण ९ कायदेशिर वारस आहेत त्यापैकी वारस मनिषा गवळी ही दाव्यात आगोदरच प्रतिवादी क्रमांक १ म्हणून समाविष्ट आहे. सबब मयत वादीच्या उर्वरित ८ कायदेशिर वारसांना अभिलेखावर घेवून त्याबाबतची दुरुस्ती मुळ दाव्यात करणे गरजेचे आहे. वादी हिचे वारस अभिलेखावर न आल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी हिचे वारस अभिलेखावर आणण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी असे वादीचे कथन आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांच्या कथनानुसार अर्ज खरा व बरोबर नाही. सबब, त्यांनी अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. ६२ येथे प्रतिज्ञापत्र दाखल करुन कथन केले आहे की, वादी ताराबाई सीताराम पोटावळे हि दिनांक २५/०७/२०२३ रोजी मयत झाली आहे. तसेच वादीतर्फे नि.६५ लगत सादर केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी ताराबाई सीताराम पोटावळे ही दि. २५/०७/२०२३ रोजी मौजे राजापुर , ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाली असून सदरचे प्रमाणपत्र दि.०५/०९/२०२३ रोजी देण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा कालमर्यादेमध्ये दाखल करण्यात आलेला आहे. तसेच

प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे पाहता, वादी ताराबाई सीताराम पोटावळे हि मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. तसेच मयत वादी ताराबाई सीताराम पोटावळे चे प्रस्तावित वारस १ ते ९ हे कायदेशिर वारस असलेबाबतदेखिल दुमत नाही. प्रस्तुत दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकुमासाठी केला आहे. त्यामुळे मयत वादी ताराबाई सीताराम पोटावळे चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने मयत वादी चे प्रस्तावित वारस अभिलेखावर येणे व त्याप्रमाणे मुळ दाव्यात त्याबाबतची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज नि. ६१ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत वादी ताराबाई सीताराम पोटावळे हिचे वारस दाव्यात समाविष्ट करुन त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती पुढील तारखेपर्यत मुळ दाव्यात करावी.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2023.10.12 15:22:00 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १२/१०/२०२३.

**( अ.ना. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.